महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

पुणे विभागीय मंडळ,पुणे-४

क्रमांक पुविम/शाखा-ब -गोपनीय/ दिनांक :-१०/०५/२०२५.

२६६३

परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे पुणे,अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्यातील सर्व मुख्याध्यापक/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रू-मार्च २०२५ परीक्षेचा ऑनलाईन निकाल सोमवार दिनांक ०५ मे २०२५ रोजी मंडळामार्फत जाहीर करण्यात आला असून लगेचच मंगळवार दिनांक ०६ मे २०२५ पासून विद्यार्थ्यांना गुणपडताळणी,उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती व पुनर्मुल्यांकन यासाठी अर्ज करण्याची सोय मंडळामार्फत दिनांक २०/०५/२०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. पुनर्मुल्यांकन प्रक्रिया ही आपणा सर्वांना अवगत आहेच व ती प्रचलित पध्दतीप्रमाणे ती कार्यरत आहे.

फेब्रू-मार्च २०२५ परीक्षेचा निकाल माहे मे-२०२५ मध्ये म्हणजे दिनांक ०५/०५/२०२५ रोजी जाहीर झाला आहे.व कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्या आहे तेव्हा परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे आवश्यक असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून त्यापुढील कार्यालयीन कामाच्या पाच दिवसात पुनर्मुल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करावयाचा असल्याने कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अभिप्राय सादर करावयाचा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना सदर कामासाठी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षक उपलब्ध राहतील अशी व्यवस्था आपण करावी –विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची नोंद घ्यावी.

पुनर्मुल्यांकन करण्यासाठीच्या अटी शर्ती व सूचना मंडळाच्या https:// mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

MRaut
10.5.25

(डॉ.मिनाक्षी राऊत )
विभागीय सहसचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

प्रत माहितीसाठी

शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे-अहिल्यानगर-सोलापूर